<u>**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १००/२०२४**</u>

<u>**निशाणी १४ कडे आदेश**</u>

<u>**(CNR No. MHRT 080001732024)**</u>

प्रस्तूत अर्जाद्वारे पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे देवरुख यांनी सदरील पोलीस ठाण्यातील गुन्हा नोंद क्र. २८/२०२४ मधील मुद्देमाल नष्ट करणेबाबत किंवा लिलाव करुन विकणेबाबत परवानगी द्यावी याकरिता विनंती केली आहे.

**०२.** त्यांचे म्हणणे असे की, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम चे कलम ६५ (ब), (क), (ड), (ई), (फ) अन्वयेचा उपरोक्त गुन्हा नोंद करणेत आला. त्यात जप्त मुद्देमाल खालीलप्रमाणे आहे–

१. एक लोखंडी पत्र्याचे ३०० लिटर मापाचे बॅरेल.

२. एक गोल आकाराचा लाकडी चाटू.

३. एक ॲल्युमिनीअम गोल आकाराची डेग.

४. एक रबरी पाईप.

५. तीन जळकी लाकडे.

६. प्रत्येकी २० लिटर मापाचे गावठी दारुने पूर्णपणे भरलेले ०२ प्लॅस्टीक कॅन.

७. प्रत्येकी २०० लिटर मापाचे ०२ बॅरेल.

८. एक कापडाची चिंधी.

**०३.** वरील जप्त मुद्देमाल पोलीस ठाण्यात जमा आहे. मुद्देमाल ठेवण्यास जागा अपूरी आहे. त्यामुळे मिळून आलेला वरील मुद्देमाल नाश करण्यासाठी आदेश व्हावेत अशी विनंती प्रस्तुतच्या अर्जान्वये पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे देवरुख यांनी केली आहे.

**०४.** आरोपीने सदर प्रकरणी जप्त मुद्देमालाशी त्याचा काही संबंध नाही. त्याबाबत योग्य तो आदेश पारीत करावा, असे म्हणणे मांडले आहे.

**०५.** प्रस्तूत प्रकरणी दोषारोपपत्र दाखल झाले आहे. आरोपीचे प्रतिकथन नोंदवून घेतले आहे. प्रस्तूत प्रकरण संपरीक्षेकरिता प्रलंबित आहे. संपरीक्षा पूर्ण होवून प्रकरण निकाली निघण्यास काही अवधी लागणार आहे.

**०६**. वर नमूद अनुक्रमांक ०१ व अनुक्रमांक ०७ कडील रीकामे बॅरेलस् विक्री करुन त्यातून आलेली रक्कम राज्य शासनाकडे जमा करण्यात यावी यासाठी आदेश करणे उचित आहे. तसेच इतर मुद्देमाल निरुपयोगी असल्याने तो नाश करण्यासाठी आदेशीत करणे आवश्यक आहे. वरील सर्व बाबी पाहता, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४५१ अन्वये मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो–

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करणेत आला.

२. वर नमुद अनुक्रमांक ०१ व ०७ कडील बॅरेलस् मधील रसायन नाश करण्यात यावे. सदरचे दोन्ही बॅरेल सार्वजनीक लिलावाद्वारे विक्री करुन त्यातून आलेली रक्कम राज्य शासनाकडे जमा करावी.

३. वर नमूद इतर सर्व मुद्देमाल नाश करण्यात यावा.

४. वरीलप्रमाणे कार्यवाहीबाबत सविस्तर पंचनामा करण्यात यावा.

TARE BALIRAM DATTATRAYA
Digitally signed by TARE BALIRAM DATTATRAYA
Date: 2025.02.14 14:51:18 +0530

दिनांक १४/०२/२०२५ **(ब. द. तारे)**

न्यायदंडाधिकारी वर्ग–१, देवरुख

## -:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Devrukh |
| Date | :- | 14/02/2025 |
| Order signed by PO. on | :- | 14/02/2025 |
| Order uploaded on | :- | 14/02/2025 |